MHPU250012902025

शुभांगी अक्षय पारधी व इतर १
विरुध्द
अक्षय बाळू पारधी व इतर

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज नं. ४२/२०२५ मधील निशाणी क्र. ९ खालील आदेश**

जाबदेणार यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला 'जबाब/म्हणणे नाही' चा आदेश रद्द करुन जबाब/म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर अर्जदाराचे लेखी म्हणणे मागविण्यात आले.

२. अर्जातील जाबदेणार यांचे असे कथन आहे की, सदर अर्जाच्या नोटीस जाबदेणार यांना प्राप्त झाल्यानंतर ते वकिलांमार्फत न्यायालयात हजर झालेले आहे. जाबदेणार हे बाहेरगावी राहत असल्यामुळे वकिलांना सदर केसबाबत माहिती व कागदपत्रे वेळेत न दिल्यामुळे अर्जास वेळेत जबाब दाखल करता आला नाही. त्यामुळे सदर जाबदेणार यांचे विरुध्द दि. ०३/०२/२०२६ रोजी 'जबाब/म्हणणे नाही' चा आदेश पारीत झालेला आहे. सदर जाबदेणार यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायाचे दृष्टीने महत्वाचे आहे. मुळ अर्जात नमुद केल्याप्रमाणे जाबदेणार यांनी अर्जदार हिचा कोणताही छळ अथवा त्रास दिलेला नव्हता व नाही. अर्जदारास सदर केस दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, सदर जाबदेणार यांचेविरुध्द झालेला दि. ०३/०२/२०२६ रोजीचा ‘जबाब/म्हणणे नाही’ चा आदेश बाजुला करुन जबाब/म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जांवर मुळ अर्जदारातर्फे म्हणणे मागविले असता, त्यांनी प्रस्तुत अर्जांवर त्यांचे म्हणणे दाखल केले. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार, जाबदेणार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा व प्रकरण लांबणीवर टाकण्याचे इरादयाने जाणीव पुर्वक मुदतीत अर्जाचा जबाब दिलेला नाही. अर्जात नमुद विलंबाचे कारण वैधानिक नाही. अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अथवा अर्ज मंजुर करणे न्यायालयाचे मत झाल्यास जाबदेणार यांचेवर रक्कम रु.५,०००/– इतका खर्च आकारावा अशी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता, मुळ अर्जदाराने प्रस्तूतचा मुळ अर्ज हा कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण कायदयाचे कलम १२ नुसार पोटगी व इतर मागण्यांकरीता दाखल केलेला आहे. सदर जाबदेणार यांना मुळ अर्जाची नोटीस मिळाल्यानंतर ते अर्जाचे कामी हजर झालेले दिसतात. परंतु त्यांनी मुळ अर्जास मुदतीत जबाब/म्हणणे दाखल केल्याचे दिसून येत नाही. सदर जाबदेणार यांनी प्रस्तुतचा अर्ज दि. १८/०४/२०२६ रोजी दाखल केलेला असून अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. तसेच सदर जाबदेणार यांना जबाब/म्हणणे दाखल करण्यासाठी साधारण १ वर्षांपेक्षा जास्त विलंब झालेला दिसतो. तसेच जाबदेणार यांनी प्रस्तुत अर्जांसोबत त्यांचा जबाब/म्हणणे देखील दाखल केलेले आहे. त्यामुळे सदर जाबदेणार यांना जबाब/म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन जबाब/म्हणणे मुळ अर्जाचे कामी सामील करून न घेतल्यास अर्जातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व मुळ अर्ज सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे.

५. याउलट, सदर जाबदेणार यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास मुळ अर्जातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून मुळ अर्जातील वाद निर्गत करण्यास मदत होणार आहे. शिवाय अर्जदार यांनी देखील प्रस्तुत अर्जांस स्पष्ट हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर जाबदेणार यांना आपली बाजू मांडण्याची नैसर्गिक न्यायतत्वानुसार संधी देणे गरजेचे असल्याने जाबदेणार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, प्रस्तुत मुळ अर्ज हा जाबदेणार यांचेविरुध्द कौटूंबिक हिसांचारांपासून महिलांचे संरक्षण कायदयानुसार पोटगी व इतर मागण्यांकरीता असल्याने सदर जाबदेणार यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे झालेल्या विलंबाबाबत सदर जाबदेणार यांचेवर योग्य तो खर्च आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## // आदेश //

१. जाबदेणार यांचा प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. ०९ हा मंजूर करण्यात येतो.

२. जाबदेणार यांचेविरुध्द झालेला 'जबाब/म्हणणे नाही' चा आदेश बाजुला करण्यात येतो.

३. जाबदेणार यांना जबाब/म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब त्यांनी एकत्रित रक्कम रू. ५००/– (एकूण रुपये पाचशे मात्र) अर्जदार यांना देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो. सदर जाबदेणार यांनी दिलेला जबाब/म्हणणे आदेशित खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर मुळ अर्जाचे कामी दाखल करण्यात यावे.

Digitally signed by Ranjana Govind Kumbhar
Date: 2026.06.18 18:18:41 +0530

जुन्नर
दिनांक – १८/०६/२०२६

(आर. जी. कुंभार)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जुन्नर, जि. पुणे